# <u>जनसुनावणीचे इतिवृत्त</u>

**मे. अमृतसागर कंन्ट्रक्शन प्रा. लि., सी.एस. नं. ७३ ऑफ कुलाबा डिव्हीजन, नाथालाल पारिख रोड, मुंबई** येथे प्रस्तावित पुनर्बांधकामाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक **२१.१२.२०१८** रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री. शिवाजी जोंधळे<br>जिल्हाधिकारी, तथा जिल्हादंडाधिकारी,<br>मुंबई शहर | - अध्यक्ष |
| २) डॉ. जि. बा. संगेवार<br>प्रादेशिक अधिकारी, मुंबई<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई. | - सदस्य् |
| 3) श्री. संजय भोसले<br>उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -१<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई. | - संयोजक |

जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे -

सर्वप्रथम श्री. संजय भोसले, जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. 8 (V) (C) (d)- 4 शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठीचा प्रस्ताव सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी यांनी शुक्रवार, दिनांक २१.१२.२०१८ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर दैनिक नवशक्ती या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच दैनिक फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक २०.११.२०१८ रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-००१ मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई. प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनि मंडळ, सायन, मुंबई. सहाय्यक आयुक्त, अ- विभाग आफीस बिल्डींग, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,मुंबई - ४००००१, प्रादेशिक अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई. इ. ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. संजय भोसले, यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत

आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. चिपळुनकर , प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले, सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या इमारतीचा नकाशा, वाहन स्थळ तसेच रहिवाशी क्षेत्र इत्यार्दीची माहिती सादर केली. सदर प्रकल्पाचे सध्याचे क्षेत्रफळ १२७५.९२ चौ.मी. इतके असून ते सागर तटीय निर्बंधन क्षेत्र २ मध्ये येते.. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी २ इमारत आहे. सदर प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ हे ५२५९.१६ चौ.मी. इतके असेल सदर प्रकल्पात उभारण्यात येणा-या इमारत तळघर + पहिला मजला – ५ थरांचे वाहनतळ + ६ वा मजला इतर सेवांसाठी राखीव असेल + ७ ते २१ वरील मजले रहिवाशी व अरहिवाशी यांच्यासाठी असतील. प्रकल्प पुर्ण होउन रहिवासी राहण्यास आल्यानंतर पाण्याचा वापर हा ३६.९५ घ.मी. प्रती दिन इतका असेल. तर त्यातून निर्माण होणारे सांडपाणी हे ३४.९४ घ.मी. प्रती दिन इतके असेल. सदर प्रकल्पातून निघणारे घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया (STP of ३७ CMD capacity) करून ते धुण्यासाठी व बागकामासाठी वापरण्यात येईल तसेच उर्वरीत पाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वाहिनीत विल्हेवाट केली जाईल. सदर प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे वर्गीकरण सुका व ओला असे करण्यात येईल व ओल्या कचऱ्याचे (OWC) खत बनविण्यात येईल व ते बाग बगिच्यासाठी वापरण्यात येईल. तर सुका कचरा हा पुनर्वापरासाठी पाठविण्यात येईल व विकला जाईल. तसेच सदर प्रकल्पामध्ये विविध प्रकारच्या उर्जा वाचवण्यासाठीची सिस्टीम बसविण्यात येईल. सदर प्रकल्प उभारत असताना आवाजाची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. सादरीकरणाच्या शेवटी तांत्रिक सल्लागाराने प्रकल्पाधारकाकडून राबविण्यात येणार असलेल्या पर्यावरण विषयक उपाययोजनांची माहिती देवून सादरीकरण समाप्त केले.

तदनंतर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थित रहिवासी व भाडेकरु यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका टिप्पणी अथवा उपाययोजना बद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती या ठिकाणी तोंडी अथवा लेखी स्वरूपात सादर करू शकतात. सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषयासंबंधीत असणे आवश्यक आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात ये णाऱ्या उपाययोजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले.

**प्रश्नोत्तरे**

**श्री. शिवाजी जोंधळे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर**
**प्रश्न :-** घर मालकाला भाडे देता का?
**उत्तर:-** होय, घर भाडे देतो.

**डॉ. जि. बा. संगेवार, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**
**प्रश्न् :-** घरगुती सांडपाणी प्रक्रीया संयत्रणा (STP) उभारणार आहात व त्यांची देखभाल व दुरूस्तीसाठी खर्चाची तरतुद केली आहे काय ?
**उत्त्र :-** होय, आम्ही तरतुद करणार आहोत.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपण विचारलेल्या प्रश्न याचा समावेश करून पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचेआभार मानले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न् झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| संजय भोसले<br>उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई, संयोजक/सदस्य<br>जनसुनावणी समिती | डॉ. जि. बा. संगेवार<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई<br>सदस्य्<br>जनसुनावणी समिती | शिवाजी जोंधळे<br>जिल्हाधिकारी तथा<br>जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर<br>अध्यक्ष<br>जनसुनावणी समिती |